लातूर जिल्ह्यातील लघु उद्योगाच्या वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास”

जेसंशोधक

संतोष अशोकराव खरात

एम. कॉम. एम.ए.बी.एड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. ह. वा. कुलकर्णी

एम. कॉम. एम.फिल.,.पीएच.डी.

वाणिज्य विभागप्रमुख

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

ऑगस्ट 2023

अनुक्रमणिका

अ. क्र.	विवरण	पृष्ठ क्र.
1	प्रस्तावना	03
2	विषय निवडीची कारणे	05
3	विषयाचे महत्त्व	05
4	संशोधनाची उद्दिष्टे	06
5	गृहीतके	06
6	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	06
7	संशोधन पद्धती	07
8	प्रकरण रूपरेषा	09
9	संदर्भ ग्रंथ सूची	09

लातूर जिल्हयातील लघु उद्योगाच्या वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास

प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्थेत लघुउद्योगांना महत्त्वाचे स्थान आहे. लघुउद्योग हे भारतातील विकासाचे इंजन म्हणून भूमिका पार पाडतात. देशातील वाढती लोकसंख्या विकासाची संधी मानली जजाते. देशात बेकारीची समस्या हा ज्वलंत प्रश्न आहे. असे असले तरी भारताने स्वातंत्र्यानंतर लघु उद्योगाच्या विकासावर विशेष लक्ष दिले आहे. देशातील नवीन औद्योगिक धोरणाने सुद्धा बेकारीच्या समस्येवर मात करता आली नाही.

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी उद्योग, लघुउद्योग, कुटीर उद्योग यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाली आहे. देशातील उत्पादन क्षेत्रात लघु उद्योगांचा हिस्सा 40% व देशातील एकूण निर्यातीत 34% हिस्सा हा लघु उद्योगातील उत्पादनाच्या माध्यमातून केले जाते. त्याचबरोबर लघु उद्योगाच्या माध्यमातून 20 टक्के रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणावर होते. त्यासाठी भारतासारख्या विकसनशील देशाचा विचार करता लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

भारतामध्ये कुशल व मध्यम कुशल कारागीर लघु उद्योगासाठी सहज उपलब्ध होतात. लघुउद्योगामुळे भारतासारख्या विकसनशील देशात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करता येते. शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात सुद्धा मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे देशाच्या विकासासाठी लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापनाची भूमिका महत्त्वाची आहे. ज्या ठिकाणी अल्प भांडवल व कमी मनुष्यबळ लागते अशा ठिकाणी लघु उद्योगाचा प्रकार उपयुक्त ठरतो.

देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून लघु उद्योगाची भूमिका लक्षात घेता लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. कारण कोणत्याही उद्योगाचा आत्मा हा भांडवल असतो. त्यामुळे लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापन एक महत्त्वपूर्ण कार्य करते. लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापनाचा उद्देश भांडवलाची योग्य नियोजन करणे, वित्तीय नियोजन करणे, पुंजीची पूर्तता करणे, लाभाचा योग्य पुनर्वियोग करणे, पुरेसा लाभ प्राप्त करून देणे इ. आहे

लघु उद्योगाचा अर्थ

जे उद्योग अल्प प्रमाणावर वस्तूचे उत्पादन करतात यंत्रसामुग्रीची मदत घेतात कामगारांची नेमणूक करतात व विजेचाही वापर करतात अशा उद्योगांना लघुउद्योग असे म्हणतात. 21 डिसेंबर 1999 नुसार “खालील अटीची पूर्तता करणाऱ्या औद्योगिक घटकांना लघुउद्योग असे म्हणतात. यंत्र आणि उपकरणे यासारख्या स्थिर मालमत्तेमधील स्वतः मालकाने केलेली भाडेपट्टी घेतलेली किंवा भाडेकराने केलेली गुंतवणूक रुपये एक कोटी पेक्षा जास्त असू नये त्यास लघुउद्योग असे म्हणतात. सध्या लघु उद्योगाच्या व्याख्येत बदल झालेला आहे

अ) विजेचा वापर परंतु 50 पेक्षा कमी कर्मचारी

आ) विजेचा वापर न करता 50 पेक्षा जास्त परंतु 100 कर्मचाऱ्यापेक्षा कमी.

सूक्ष्म लघु आणि मध्यम विकास कायदा 2006 नुसार (MSMED Act 2006)

व्यवसाय दोन प्रकारात विभागले जातात

1) उत्पादनक्षेत्र : 25 लाखापेक्षा जास्त पण 5 कोटीपेक्षा कमी.

2) सेवा क्षेत्र : वीस लाखापेक्षा जास्त पण दोन कोटी पेक्षा जास्त नाही

असे असले तरी आपणास लघु उद्योगाचे क्षेत्र पुढीलप्रमाणे सांगता येतील.

लघु उद्योगाचे क्षेत्र

अ) पारंपारीक

1. हातकाम

2. हस्त कौशल्य

3. का त्यापासून वस्तू बनवणारे उद्योग

4. रेशीम उद्योग

5. खादी व ग्रामीण उद्योग

ब) आधुनिक

1. लघुउद्योग

2. यंत्रमाग

वरील सर्व उद्योग लातूरमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी स्थापन झाली आहेत. लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापनाची भूमिका महत्त्वाची आहे प्रस्तुत विषयांमध्ये लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी लातूर जिल्हयामधील लघु उद्योगाच्या वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

विषय निवडीची कारणे

1) लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापकाची भूमिका जाणून घेणे.

2) लघु उद्योगातील आर्थिक वित्तीय कमतरता जाणून घेणे.

3) लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापनामार्फत रोजगाराच्या संधीचा शोध घेणे.

4) लघु उद्योगाअंतर्गत येणाऱ्या कर्मचारी कामगार मालक विपणन वित्तीय संस्था यांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

5) लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास करणे

6) राज्य व केंद्र सरकारकडून लघु उद्योगासाठी राबविण्यात येणाऱ्या वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.

वरील कारणाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने संशोधनासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

विषयाचे महत्त्व

1) रोजगार निर्मितीसाठी उपयुक्त.

2) नैसर्गिक संसाधनाचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी.

3) समप्रमाणात आर्थिक विकास होण्यास मदत.

4) स्थलांतरात घट होण्यास उपयुक्त.

5) उद्योगाचे यशस्वी संचलन करण्यासाठी.

6) उद्योगांचा विस्तार करण्यासाठी.

7) स्थानिक बाजारपेठेचे जागतिक बाजारपेठेत रुपांतर करण्यासाठी.

संशोधनाची उद्दिष्टे

1) लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.

2) लघु उद्योगातील भांडवल उभारणी व खर्च अभ्यासणे.

3) लघु उद्योगातील वित्तीय समस्येचे अध्ययन करणे.

4) लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापन आणि आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

5) लघु उद्योगातील व्यवस्थापन प्रक्रियेचा अभ्यास करणे.

गृहीतके

1) निधी उभारणीत वाढ होते.

2) वित्तीय व्यवस्थापनाची कौशल्य आणि ज्ञानाचे फायदे मिळतात.

3) वित्तीय व्यवस्थापन पद्धती सुधारते

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

1) सदरील विषयाच्या अभ्यासात फक्त लातूर जिल्हयातील लघु उद्योगाचा समावेश राहील.

2) अभ्यासांती येणारे निष्कर्ष हे फक्त त्या त्या लघु लघु उद्योगाशी संबंधित असतील सर्वच लघु उद्योगांना लागू पडतीलच असे नाही.

3) प्रस्तुत संशोधनात केवळ प्रमुख आर्थिक बाबीचा विचार केला जाईल.

4) प्रस्तुत संशोधन प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम सामग्री वर आधारित राहील.

संशोधन पद्धती

सदरील अभ्यास हा लातूर जिल्हयातील लघु उद्योगाच्या वित्तीय व्यवस्थापनापुरताच मर्यादित आहे. लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापनाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठीचा कालावधी 2015 ते 2025 आहे. वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास करताना खर्च व उत्पन्नाचा विचार केला जाईल. प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्रामुख्याने प्राथमिक सामग्रीचा व दुय्यम सामग्रीचा वापर केला जाईल.

प्राथमिक सामग्री

लघु उद्योगातील जमा-खर्च पुस्तके, मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण इत्यादीच्या माध्यमातून प्राथमिक सामग्रीचे संकलन केले जाईल.

दुय्यम सामग्री

दुय्यम माहितीचे संकलन मासिके, राज्य व केंद्र सरकारचे अहवाल, शासकीय रेकॉर्ड, वर्तमानपत्रे, पुस्तके, आयोग, परिषदा व समितीचे अहवाल, इंटरनेट इत्यादी माध्यमातून केले जाईल.

नमुना निवड

लातूर जिल्हयातील लघु उद्योगाच्या वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास करताना मराठवाड्यातील औद्योगिक क्षेत्रातील दुसऱ्या क्रमांकाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो.

तक्ता क्र.1

मराठवाड्यातील जिल्हानिहाय लघु उद्योग

अ.क्र.	जिल्ह्याचे नाव	लघु उद्योगांची संख्या
1	छत्रपती संभाजीनगर	3583
2	परभणी	697
3	हिंगोली	120
4	बीड	1420
5	नांदेड	1455
6	धाराशिव	630
7	लातूर	2029
8	जालना	890
	एकूण	**10824**

Source : Directorate of industrial Government of Maharashtra 2014

नमुना निवड ही लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील लातूर, रेणापूर निलंगा, चाकूर, औसा, उदगीर, अहमदपूर, जळकोट, देवणी, शिरूर अनंतपाळ या तालुक्यातून नमुना निवडीसाठी लघु उद्योगाची निवड केली जाईल.

अ.क्र.	तालुके	लघु उद्योगांची संख्या
1	लातूर	42
2	उदगीर	45
3	जळकोट	15
4	देवणी	15
5	निलंगा	15
6	अहमदपूर	20
7	शि.अनंतपाळ	15
8	चाकूर	15

9	औसा	10
10	रेणापूर	10

Source : Compiled by Author

सांख्यिकीय तंत्र

प्राथमिक व दुय्यम पद्धतीने गोळा केलेल्या सांख्यिकीय माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करून विविध प्रकारच्या सांख्यिकीय तंत्रामध्ये कैंद्रीय प्रवृत्तीचे परिमापे, प्रमाण विचलन, सहसंबंध गुणांक, कोष्टके, आलेख इत्यादी तंत्राचा वापर केला जाईल.

प्रकरण रूपरेषा

प्रस्तुत संशोधनाची मांडणी एकूण सहा प्रकरणात करण्यात येणार असून ती खालीलप्रमाणे आहेत.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे - लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापन रचना

प्रकरण चौथे - सर्वेक्षण केलेल्या लघु उद्योगाचे विश्लेषण

प्रकरण पाचवे - लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापनाच्या समस्या आणि उपाययोजना

प्रकरण सहावे - निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ ग्रंथ सूची

1) Vasant Desai- Himalaya publication-Small scal industries Enterprises

2) प्रा. भोसले पी.टी, प्रा.डोके के.बी., वित्तीय व्यवस्थापन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

3) डॉ. निर्मल भालेराव. डॉ.स.श्री. देसाई, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, 2013

4) Dr.jalmani R.K -Prateekasha Publication Jaipur 1987

5) Shama K.K.-Mangal deep jaypur2001 entrepreneurship and Small business

6) Small and medium enterprises (MSMC) in the Indian economy - business